जिल्हा व सत्र न्यायालय, जालना

सूचनापत्र

वित्तीय वर्ष 2026–2027 या वर्षातील आयकराची गणना करुन फॉर्म नं.16 हे ऑनलाईन तयार करुन घेणे, तसेच जी.एस.टी. चे मासीक विवरणे ऑनलाईन अपलोड करणे या करीता जाणकार असणा–या तज्ञाकडून (सी.ए.) जिल्हा न्यायालय जालना आणि जिल्हा न्यायालयाच्या अंतर्गत येणारे सर्व न्यायीक अधिकारी व कर्मचारी असे अंदाजे 400 ते 450 जणांची नियमानुसार आयकराची गणना करुन ऑनलाईन फॉर्म नंबर 16 देणे आवश्यक आहे, तसेच चालू वित्तीय वर्ष 2026–2027 चे प्रत्येक तिमाहीची ऑनलाईन माहिती (ई–टीडीएस) (सॅलरी 24क्यू) व वेतना व्यतिरिक्त (नॉन सॅलरी 26क्यू) इत्यादींची माहिती आयकर विभागाने व जी.एस.टी. विभागाने निर्देशीत केलेल्या वेळेत भरणे आवश्यक आहे, तसेच वरील विभागांकडून वेळोवेळी येणा–या नोटीसेस्चे निराकरण करण्याचे काम करणे इत्यादी बाबतची सर्व कामे करणेसाठी वार्षिक फी किती आकारणार, याबाबतचे आपले दरपत्रक/ निविदा या कार्यालयास 30.04.2026 रोजी सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत सादर करावे. या कामासाठी ज्यांची वार्षिक फी सर्वात कमी असेल त्यांची कर सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात येईल.

सोबत दिलेल्या नियम, अटीं व शर्तीनुसार सदर कामाबाबतची फीस्चे दरपत्रक/निवीदा सिलबंद पाकीटामध्ये करावे व त्या पाकीटावर "कर सल्लागार नेमणूकीसाठीचे दरपत्रक" असे नमूद करुन "मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जालना" यांचे नावे दिनांक 30.04.2026 रोजी सायंकाळी 05:30 वाजेपर्यंत मिळतील, अशा बेताने पाठविण्याची व्यवस्था करावी. यानंतर प्राप्त झालेले दरपत्रक (निविदा) ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

आदेशान्वये,

प्र.प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय
जालना

दिनांकः 17.04.2026

प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय
जालना

जिल्हा व सत्र न्यायालय, जालना.

वित्तीय वर्ष 2026–2027 करीता कर सल्लागार म्हणून नेमणूक करण्यासाठी खालील नियम, अटी व शर्ती लागू राहतील.

01) जिल्हा न्यायालय जालना आणि जिल्हा न्यायालयाच्या अंतर्गत येणारे सर्व न्यायीक अधिकारी व कर्मचारी असे अंदाजे 400 ते 450 जणांची नियमानुसार आयकराची गणना करुन ऑनलाईन फॉर्म नंबर 16 देणे आवश्यक आहे, तसेच चालू वित्तीय वर्ष 2026–2027 चे प्रत्येक तिमाहीची ऑनलाईन माहिती (ई–टीडीएस)(सॅलरी 24क्यू) व वेतना व्यतिरिक्त (नॉनसॅलरी 26क्यू) इत्यादींची माहिती आयकर विभागाने व जी.एस.टी. विभागाने निर्देशीत केलेल्या वेळेत भरणे, तसेच वरील विभागांकडून वेळोवेळी येणा–या नोटीसेस्चे निराकरण करण्याचे कामे करावी लागतील.

02) प्रत्येक अधिकृत सीए/कर सल्लागारास फक्त एकच दरपत्रक देण्याची परवानगी असेल, याची नोंद घ्यावी.

03) या कार्यालयाचे गरजांची पूर्तता करण्यात येणारे व सर्वात कमी किंमतीचे दरपत्रक मंजुर करण्यात येतील.

04) निविदाकाराने अधिकृत लेटर हेडवर दरपत्रक बंद पाकीटात सादर करणे बंधनकारक राहील.

05) दरपत्रकामध्ये इतर काही शुल्क/चार्जेस असल्यास त्यांचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.

06) दरपत्रक सादर करणा–या अधिकृत कर सल्लागाराचा या कार्यालया बरोबर कोणताही हितसंबंध नसावा, याची नोंद घ्यावी.

07) दरपत्रके सादर करताना सिलबंद पाकिटावर "कर सल्लागार नेमणूकीचे दरपत्रक" असा स्पष्ट उल्लेख करावा व ती "मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,जालना" यांचे नांवे पाठविण्यात यावी.

08) सदरील सिलबंद दरपत्रक ही दिनांक 30.04.2026 रोजी सायंकाळी 05:00 वाजेपर्यंत या कार्यालयात स्विकारण्यात येतील. त्यानंतर प्राप्त होणारी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाही, यांची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

09) प्राप्त झालेली सिलबंद दरपत्रके हे जिल्हा न्यायालय "त्रिसदस्यीय वस्तू खरेदी सल्लागार समिती" यांचे जिल्हा न्यायाधीश–2, जालना यांचे नीजीकक्षात दिनांक 02.05.2026 रोजी ठरलेल्या वेळेत व ठिकाणी उघडण्यात येतील. जर काही तांत्रीक अडचण निर्माण झाल्यास त्रिसदस्यीस समीतीच्या निर्णयानुसार ती उघडण्यात येतील.

10) सदरील दरपत्रके स्विकारण्याचा व नाकारण्याचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जालना राखून ठेवत आहे.

आदेशान्वये

दिनांकः .04.2026

प्र.प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय, जालना

प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय
जालना